# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६३४/२०१७/२७

**(नोदंणी क्रमांक 2017060029)**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- १३.०६.२०१७ |
| निकाल | दिनांक :- २५.०७.२०१७ |

श्री. भगवान तुकाराम बनसोडे — तक्रारदार
जे-२१/१०, एन-२, सिडको,
मुकुंदवाडी,
औरंगाबाद ४०००० १.
(ग्राहक क्रमांक ४९००१०८५९५४६)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. भगवान तुकाराम बनसोडे, रा. सिडको, मुंकुंदवाडी, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०८५९५४६ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक १३.०६.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.**

अर्जदाराचे विद्युत मिटर हे घरगुती वापराचे असून विजेचा वापर देखील जेमतेम आहे. तसेच गैरअर्जदार यांनी पुर्वी दिलेल्या देयकामध्ये जूने मीटर चालू असून त्याची रिडींग देखील दाखविली आहे. असे असतांना गैरअर्जदार कमंपनीमार्फत आलेल्या कर्मचाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करुन अर्जदाराची मानसिक कुचंबना करण्याच्या गैरहेतूने अतिरिक्त रुपये १,१९,८२०/- चे बील पाठविले आहे. त्यामुळे अर्जदारास मानिसक धक्का बसला आहे. सदरील देयक अनावश्यक असून एवढी वीज अर्जदाराने वापरली नाही.

अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षात दिलेल्या निर्णयात देखील दिलेल्या देयकाची झालेली आकारणी चुकीची असल्याबाबत आणि त्या बाबत समाधानी नसल्याचे निष्कर्ष निर्णयात दिसतात आणि या तफावतीमुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने रुपये ४३,७०२/- एवढी रक्कम वीज देयकातून कमी केलेली आहे. खरेतर आलेले अतिरिक्त देयक पुर्णच रद्द करुन केवळ १४६ युनिटच्या रिडींग देयक देणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जदाराने वरील देयक रद्द करुन १४६ युनिटचे देयक देण्याबाबत मंचास विनंती केलेली आहे.

**कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.**

कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, चिकलठाणा उपविभाग, औरंगाबाद यांनी असे सादर केले आहे की, दिनांक १६.०५.२०१६ रोजी फिरते पथक, वाशिम यांनी त्यांना मिळालेल्या माहितीनुसार सदर ग्राहकाच्या मीटरची ग्राहकाच्या उपस्थितीत पाहणी केली असता मीटरचे दोन्ही सिल्स हाताळले असल्याचे आढळुन आल्याने अर्जदाराच्या उपस्थितीत विद्युत मीटर उघडण्यात आले. सदर मीटर उघडल्यावर मीटरच्या आतील न्युट्रलच्या CT ची लाल रंगाची वायर तोडली असल्याचे निदर्शनास आले. तसेच पंचनाम्याच्या वेळी ग्राहकाचा एकुण भार १.६६ KW असा आढळुन आला आहे. अर्जदार यांनी त्यांना कमी देयक प्राप्त व्हावे म्हणुन त्यांना देण्यात आलेल्या विद्युत पूरवठयाच्या मीटर मध्ये छेडछाड केल्याचे निदर्शनास आल्यामुळे फिरते पथक, वाशिम यांनी भारतीय विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम १३५ नुसार अर्जदारास रुपये १,१८,३१९/- चे विद्युत देयक देणे बाबतची विनंती अतिरिक्त कार्यकारी अभियंता, चिकलठाणा यांना केली होती. त्यांनी केलेल्या विनंतीनुसार उपविभागीय कार्यालयाने भारतीय विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम (१३५ ) अंतर्गत रुपये १,१८,३१९/- चे देयक दिले होते. ग्राहकाने देयक न भरल्यामुळे फिरते पथक, वाशिम यांनी ग्राहकावर भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार जालना पोलीस स्टेशन येथे FIR दाखल केलेला असून त्याचा पत्र क्रमांक ११०६/२०.०५.२०१६ असा आहे. त्यामुळे हा अपराध ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच यांच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी न करण्याची विनंती करण्यात आली आहे.

४/-

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे  निष्कर्ष</u>**

१)  ग्राहकाने देयक न भरल्यामुळे फिरते पथक, वाशिम यांनी ग्राहकावर भारतीय विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम (१३५ ) नुसार जालना पोलीस स्टेशन येथे FIR दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरहू प्रकरण ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच यांच्या कक्षात येत नाही.  त्यामुळे सदरहू अर्ज खारीज करणे उचित ठरेल.

वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सूनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे,  त्याचप्रमाणे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)  अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२)  केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| . डॉ.भास्कर गो.पालवे | लक्ष्मण मु. काकडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य |